**खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे**

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

**राजगुरुनगर, ता. खेड, जि. पुणे**

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष : २०२२ – २३

### राष्ट्रीय सेवा योजना – रानभाज्या महोत्सव

पुढारी

# आहार, व्यवहार शुद्ध असणे आवश्यक

## ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांचे मत; राजगुरू महाविद्यालयात रानभाज्या महोत्सव

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

जीवनात आचार-विचारांबरोबर आहार आणि व्यवहार शुद्ध असले तरच शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते. पूर्णत: सेंद्रिय, पौष्टिक आणि औषधी असलेल्या रानभाज्यांविषयीचे परंपरागत ज्ञान विद्यार्थ्यांनी अवगत करून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी रानभाज्या महोत्सवांसारख्या उपक्रमांची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांनी केले.

हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टे-पाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान पंचायत समिती खेड यांच्या वतीने आयोजित दोनदिवसीय रानभाज्या महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. या प्रसंगी पोलिस निरीक्षक सतीशकुमार गुरव, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर,



**राजगुरू महाविद्यालयात रानभाज्या महोत्सवाचे उद्घाटन करताना पोलिस निरीक्षक सतीशकुमार गुरव, संस्था अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील.**

संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे, तालुका अभियान व्यवस्थापक लतिका भालेराव आदी उपस्थित होते.

या प्रदर्शनात भोरगिरी (भिवेगाव), भोमाळे (पाभे), टोकावडे, नायफड, शिरगाव, मोरोशी, डेहणे, खरपूड या गावांतील स्वयंसहायता बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तू व रानभाज्यांचे स्टॉल लावले. त्यामध्ये कुरडू, चैताचा बार, गौराई, कोबल, चिचुरड, रानआळू, तोंडी, भांगरी, पाथरी, केळफूल, शेवगा, मोखा, भारंगी, काटे- माठ, कुसरा, कुळू अशा रानभाज्यांचा समावेश होता.

प्रास्ताविक डॉ. गणेश धुमाळ यांनी, तर सूत्रसंचालन डॉ. प्रभाकर जगताप यांनी केले. आभार डॉ. कीर्ती नितनवरे यांनी मानले.

My Gramin Edition
Sep 25, 2022 Page No. 7
newspaper.pudhari.co.in

लोकमत

जीवनात आहार आणि व्यवहार शुद्ध असणे आवश्यक : बुट्टेपाटील

# राजगुरू महाविद्यालयात रानभाज्या महोत्सवाचे आयोजन

लोकमत न्यूज नेटवर्क

**राजगुरूनगर** : माणसाच्या जीवनात आचार-विचारांबरोबर आहार आणि व्यवहार शुद्ध असेल तरच शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते. पूर्णत: सेंद्रिय, पौष्टिक आणि औषधी असलेल्या रानभाज्यांविषयीचे परंपरागत ज्ञान विद्यार्थ्यांनी अवगत करून घेणे गरजेचे असून, त्यासाठी रानभाज्या महोत्सवांसारख्या उपक्रमांची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

ते हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान पंचायत समिती खेडच्या वतीने पोषण माह अंतर्गत आयोजित दोन दिवसीय रानभाज्या महोत्सवाच्या उद्घाटनप्रसंगी बोलत होते.

याप्रसंगी पोलीस निरीक्षक सतीशकुमार गुरव, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, संचालक बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे, तालुका अभियान व्यवस्थापक लतिका भालेराव, शिवाजी तेलंगे, सुरेश घनवट उपस्थित होते.

या प्रदर्शनात भोरगिरी (भिवेगाव), भोमाळे (पाभे), टोकावडे, नायफड, शिरगाव, मोरोशी, डेहणे, खरपूड या गावांतील स्वयंसहायता बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तू व रानभाज्यांचे स्टॉल लावले. त्यामध्ये कुरडू, चैताचा बार, गौराई, कोबल, चिचुरड, रानआळू, तोंडी, भांगरी, पाथरी, केळफूल, शेवगा, मोखा, भारंगी, काटे- माठ, कुसरा, कुळू अशा रानभाज्यांचा समावेश होता.



राजगुरू महाविद्यालयात रानभाज्या महोत्सवाचे उद्घाटन करताना पोलीस निरीक्षक सतीशकुमार गुरव, संस्थाध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील.

महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी यांनी या रानभाज्या महोत्सवास भेट देऊन त्यांचा आस्वाद घेतला. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. गणेश धुमाळ यांनी, सूत्रसंचालन डॉ. प्रभाकर जगताप यांनी केले तर आभार डॉ. कीर्ती नितनवरे यांनी मानले.

Hello Pune Gramin
Page No. 6 Sep 25, 2022
Powered by: erelego.com

प्रभात शनिवार, दि. २४ सप्टेंबर २०२२

# सुदृढतेसाठी आहार, व्यवहार शुद्ध असावेत

### ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील : राजगुरूनगर येथे रानभाज्या महोत्सव



राजगुरुनगर : रानभाज्याची माहिती आणि आस्वाद घेताना विद्यार्थी.

राजगुरूनगर, दि. २३ (प्रतिनिधी) - माणसाच्या जीवनात आचार-विचारांबरोबर आहार आणि व्यवहार शुद्ध असले तरच शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते. पूर्णतः सेंद्रिय, पौष्टिक आणि औषधी असलेल्या रानभाज्यांविषयीचे परंपरागत ज्ञान विद्यार्थ्यांनी अवगत करून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी रानभाज्या महोत्सव यांसारख्या उपक्रमांची आवश्यकता आहे. असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.

राजगुरुनगर येथे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान पंचायत समिती खेड यांच्या वतीने पोषण माह अंतर्गत आयोजित दोन दिवसीय रानभाज्या महोत्सवाच्या उद्घाटन ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक सतीश गुरव, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे, तालुका अभियान व्यवस्थापक लतिका भालेराव यांच्यासह ग्रामसंघाच्या (बचत गट) महिला, विद्यार्थी उपस्थित होते.

### या रानभाज्यांचा समावेश

या प्रदर्शनात मोरोशी, भोरगिरी, भिवेगाव, भोमाळे, पाभे, टोकावडे, नायफड, शिरगाव, डेहणे, खरपूड या गावांतील स्वयंसहायता बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तू व रानभाज्यांचे स्टॉल लावले. त्यामध्ये कुरडू, चैताचा बार, गौराई, कोबल, चिचुरड, रानआळू, तोंडी, भांगरी, पाथरी, केळफूल, शेवगा, मोखा, भारंगी, काटे- माठ, कुसरा, कुळू, तेरा, भोकरे आदी रानभाज्यांचा समावेश होता.

उपस्थितांनी या रानभाज्या महोत्सवास भेट देऊन त्यांचा आस्वाद घेतला. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. गणेश धुमाळ यांनी, सूत्रसंचालन डॉ. प्रभाकर जगताप यांनी तर डॉ. कीर्ती नितनवरे यांनी आभार मानले.

# सुदृढतेसाठी आहार, व्यवहार शुद्ध असावेत

### ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील : राजगुरूनगर येथे रानभाज्या महोत्सव

राजगुरूनगर, दि. २३ (प्रतिनिधी) - माणसाच्या जीवनात आचार-विचारांबरोबर आहार आणि व्यवहार शुद्ध असले तरच शारीरिक व मानसिक आरोग्य सुदृढ राहते. पूर्णतः सेंद्रिय, पौष्टिक आणि औषधी असलेल्या रानभाज्यांविषयीचे परंपरागत ज्ञान विद्यार्थ्यांनी अवगत करून घेणे गरजेचे आहे. त्यासाठी रानभाज्या महोत्सव यांसारख्या उपक्रमांची आवश्यकता आहे. असे प्रतिपादन खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांनी केले.



राजगुरुनगर : रानभाज्याची माहिती आणि आस्वाद घेताना विद्यार्थी.

राजगुरुनगर येथे हुतात्मा राजगुरू महाविद्यालय व साहेबरावजी बुट्टेपाटील महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान पंचायत समिती खेड यांच्या वतीने पोषण माह अंतर्गत आयोजित दोन दिवसीय रानभाज्या महोत्सवाच्या उद्घाटन ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी ते बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून पोलीस निरीक्षक सतीश गुरव, संस्था उपाध्यक्ष नानासाहेब टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, प्राचार्य डॉ. शिरीष पिंगळे, प्राचार्य डॉ. एच. एम. जरे, उपप्राचार्य डॉ. व्ही. डी. कुलकर्णी, डॉ. संजय शिंदे, प्रा. व्ही. बी. दौंडकर, प्रबंधक कैलास पाचारणे, तालुका अभियान व्यवस्थापक लतिका भालेराव यांच्यासह ग्रामसंघाच्या (बचत गट) महिला, विद्यार्थी उपस्थित होते.

### या रानभाज्यांचा समावेश

या प्रदर्शनात मोरोशी, भोरगिरी, भिवेगाव, भोमाळे, पाभे, टोकावडे, नायफड, शिरगाव, डेहणे, खरपूड या गावांतील स्वयंसहायता बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तू व रानभाज्यांचे स्टॉल लावले. त्यामध्ये कुरडू, चैताचा बार, गौराई, कोबल, चिचुरड, रानआळू, तोंडी, भांगरी, पाथरी, केळफूल, शेवगा, मोखा, भारंगी, कांटे- माठ, कुसरा, कुळू, तेरा, भोकरे आदी रानभाज्यांचा समावेश होता.

उपस्थितांनी या रानभाज्या महोत्सवास भेट देऊन त्यांचा आस्वाद घेतला. प्रास्ताविक रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. गणेश धुमाळ यांनी, सूत्रसंचालन डॉ. प्रभाकर जगताप यांनी तर डॉ. कीर्ती नितनवरे यांनी आभार मानले.

**डॉ. संजय शिंदे**
**प्रसिद्धी विभाग प्रमुख**